भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ८३१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/१२/२०१६

१) विस्फोटक पदार्थाचा परवाना नसतांना वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १९/१२/२०१६ चे १३.३० ते १५.०० वा. दर. यातील वाहन चालकाने आपल्या ताब्यातील विस्फोटक पदार्थ वाहतुक करणारे वाहन चालकाकडे विस्फोटक पदार्थ वाहतुक करण्याच्या परवाना नसतांना वाहतुक करतांनी मिळुन आल्याने व यातील तिन्ही चालकांना विस्फोटक पदार्थ वाहतुक करणारे वाहन चालविण्यास लावणारे एम.टी. हेड ऑफ सेक्शन व जनरल मॅनेजर आयुध निर्माणी जवाहरनगर यांचे विरुध्द सरतर्फे फिर्यादी पोउपनि. पाटील पोस्टे जवाहरनगर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १९० मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. नागरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

२) झोपडीला आग लागुन महीलेचा मृत्यु. :–

दिंनाक. १८/१२/२०१६ रोजी २३.३० वा. दर. यातील फिर्यादी सतोष नथ्थुजी बागडे वय ४० वर्ष, रा. निष्टी यांचे घराचे बाजुला असलेल्या बकऱ्यांच्या झोपडीला अचानक आग लागल्याने झोपडीत बांधलेल्या शेळया बाहेर काढण्या करीता मृतक सौ. कल्पना संतोष बागडे वय ३५ वर्ष, रा. निष्टी ही झोपडीत गेली असता अचानक झोपडीवर असलेल्या टिनाखाली पडल्याने मृतक हिला झोपडीचे बाहेर निघता न आल्याने मृतक ही आगीत जळुन मरण पावली असे फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डहाके पो. स्टे. पवनी हे करीत आहे.

३) गळफास लावुन इसमाचा मृत्यु. :–

दिंनाक. १९/१२/२०१६ रोजी १२.०० वा. दर. यातील मृतक फत्तु केशव कांबळे वय ३० वर्ष, रा. धर्मापुरी यांचे स्वत:च्या राहते घराचे मयालीला नॉयलान दोरीने गळफास लाऊन मरण पावल्याने फिर्यादी तुलाराम केशव कांबळे वय २८ वर्ष, रा. धर्मापुरी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो. स्टे. दिघोरी हे करीत आहे.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक १९/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहनाकरीता ०१ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ११ केसेस व ईतर वाहनांवरती ३८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.